**नि.फौं.ख. क्र. ५०१/२०१८**
**नि.८४**

**फिर्यादी करीता साक्षीदार क्र.३**
मी शपथेवर कथन करतो की,
माझे नावः रमेश सोमनाथ भोसले,
माझे वयः ४७ वर्षे, कामधंदाः—पो.ह.ब.न.८४३
पत्ता : पुणे नियंत्रण कक्ष , पुणे.
**फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा दोषारोपापूर्वीचा पुरावा वकिल श्री. आर डी कोकरेः—**

**आरोपी क्र.१ व ४ चे वकिलांनी सदरचा साक्षीदार हा मुळ तक्रार अर्जामध्ये लिस्टमध्ये दाखल नसल्याने तो तपासण्यास आक्षेप घेतला. खटल्यातील नि.८३ मधील फिर्यादीचे वकिलांनी सदरचा साक्षीदार तपासण्याकामी दिलेला परवानगीचा अर्ज मंजूर करण्यात आला असल्याने सदरचा साक्षीदार तपासण्यास परवानगी देण्यात आली.**

मला साक्षीसमन्स आलेले आहे. फिर्यादी सुनिल शहा हे माझे शेजारी रहाण्यास असल्याने मी त्यांना ओळखतो. आरोपी क्र.१ सागर कन्हेरे, क्र.२ रामेश्वर अचलकर, क्र.३ तुषार कदम व क्र.४ उदयसिह शिंदे हे माझे ओळखीचे आहेत. आजरोजी उदयसिंह शिंदे हे न्यायालयात उपस्थीत नाहीत. इतर आरोपी आज न्यायालयात उपस्थीत आहेत. सदर आरोपी यांनी भागीदारीमध्ये मौजे इंदापूर येथील सर्व्हे न.२५४/२ मध्ये गुलमोहर बिल्डींग बांधण्याची जाहिरात दिली होती. आरोपी हे बिल्डर आहेत. त्या जाहिरातीमध्ये १०० टक्के पार्किंग, २४ तास बोअरवेलचे पाणी, वॉटर प्युरीफायर, व्हीडीओ डोअरबेल अशा सुविधा देण्याबाबत आश्वासीत केले होते. या फिर्यादीने सन २०१३ साली गुलमोहर सोसायटीमध्ये फ्लॅट नं.२०२ हा खरेदी केला होता. आरोपी यांनी खरेदीखतामध्ये सर्व सुविधा देण्याचे लेखी मान्य केले आहे. आरोपी यांनी पार्किंगमध्ये एक फ्लॅट बेकायदेशीरीत्या बांधलेला आहे. सदरचा फ्लॅट साळुंखे नावाच्या इसमास विकलेला आहे. गुलमोहर सोसायटीसाठी पाणी पुरवठा करणारी बोअरवेलची मशिन साळुंखे यांच्या अनधिकृतरित्या बांधलेल्या फ्लॅटचे बेडरूममधून गेलेली आहे. गेल्या ८ वर्षापासून बोअरवेलची मोटार जळालेली असल्याने व ती मोटार साळुंखे यांच्या बेडरूममध्ये असल्याने फिर्यादी यांना पाणी वापरण्याची गैरसोय झालेली आहे. आरोपी यांच्याकडून आश्वासीत केलेल्या कोणत्याही सुविधा फिर्यादीस मिळालेल्या नाहीत. आरोपी यांनी सदर बिल्डींगचा पुर्णत्वाचा दाखल आहे असे फिर्यादीस सांगितले होते. परंतू फिर्यादी यांनी इंदापूर नगरपालिका येथे चौकशी केली असता वरील आरोपींनी कोणताही पुणत्वाचा दाखल घेतलेला नाही असे सांगण्यात आले. या सर्व कारणांमुळे फिर्यादीची फसवणूक होवून

आर्थिक व मानसिक नुकसान झालेले आहे. मला वरील बाबी माहित असण्याचे कारण म्हणजे मी स्वत: गुलमोहर सोसायटीमध्ये फ्लॅट नं.२०३ मध्ये राहण्यास आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास राखुन ठेवण्यात आला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

(श्रीमती एस. एस. साळुंखे )

दि.१२/०९/२०२३. ३रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ता. इंदापूर, जि. पुणे.